**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आपासाहेब गुरुबसापा हळींगळे
गुरु अपार्टमेंट, साकेकर हॉस्पिटलसमोर,
जयहिंद कॉलनीजवळ, विश्रामबाग, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३/सांगली/ २००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि. १४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आपासाहेब गुरुबसापा हळींगळे
गुरु अपार्टमेंट, साकेकर हॉस्पिटलसमोर,
जयहिंद कॉलनीजवळ, विश्रामबाग, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, सांगली प्रतिनिधी श्रीमती एम.डी.घोडे

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्रीमती एम.डी.घोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.७.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.८.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.१०.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.४.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**
शासनाकडून योजनांतर्गत घ्यावयाच्या कामास विहित केलेले जे निकष आहेत त्याची यादी.

| | |
|---|---|
| | कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांनी स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कामांना प्रशासकीय मान्यता देताना कार्यालयीन यंत्रणांना ज्या १४ अटी पाळण्याचे बंधन घातले आहे त्यातील कोणत्या अटी यंत्रणेने पाळल्या नाहीत याची माहिती. तसेच कामे पूर्ण झाल्यानंतर सदर रस्ते पुढील देखभालीसाठी ग्रामविकास अधिकारी अथवा सरपंच ग्रामपंचायत, कुपवाड यांना हस्तांतर झाले का. |

## विवेचन

शासकीय वसाहत, कुपवाड व शासकीय वसाहत, विश्रामबाग, सांगली अंतर्गत रस्त्याच्या खडीकरणासंबंधातील माहिती अपीलकर्ता श्री.आपासाहेब गुरुबसापा हळींगळे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी चुकीची माहिती दिल्याच्या कारणावरुन श्री.हळींगळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे अपील केले. जिल्हा नियोजन मंडळाने घातलेल्या १४ अटींचे पालन या कामाबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मिरज यांनी केलेले नाही. त्यामुळे त्यांच्याकडून आलेल्या अहवालावर जिल्हाधिकारी यांनी चौकशी करावी, अशी मागणी श्री.हळींगळे यांनी अपिलात केली होती. कार्यकारी अभियंता यांच्या अहवालाची पडताळणी करुन ३० दिवसात श्री.हळींगळे यांना कळविण्याचा आदेश जिल्हाधिकारी, सांगली यांनी अपिलाच्या निर्णयात दिला. त्यानुसार जिल्हा नियोजन अधिकारी यांनी पडताळणीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी व अपीलकर्ता या दोघांनाही कळविला. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ खाली अर्ज व प्रथम अपील असून श्री.हळींगळे यांनी लोकआयुक्तांकडे द्वितीय अपील केले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ निरसित झाला असल्याने लोक आयुक्तांनी अपील परत पाठविले. त्यानंतर श्री.हळींगळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील विलंब झालेला असतानाही आयोगाने दाखल करुन घेतले.

श्री.हळींगळे हा विषय सातत्याने मांडत असून वेगवेगळ्या पातळ्यांवर अर्ज, तसेच न्यायालयीन दावे गेल्या काही वर्षांपासून करीत आले आहेत. माहितीच्या अधिकारातही विविध सार्वजनिक प्राधिकरणांकडे त्यांनी केलेले अर्ज व अपिले व त्या अनुषंगाने आयोगाकडे केलेली

काही अपिले यांचा निर्णय यापूर्वी देण्यात आलेला आहे. मूळ जागा ही श्री.हळींगळे यांची असून त्यांनी भूखंडांची विक्री केली आहे. त्यातील रस्त्याच्या जागेच्या भरपाईसाठी दिवाणी न्यायालयात केलेल्या दाव्याचा निकाल त्यांच्या विरोधात झाला आहे. संबंधित कामे १० वर्षांपूर्वीची असून अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या समवेत त्यांची पाहणी करुन अटींचा भंग झाला किंवा नाही याबाबतचा अहवाल द्यावा, ही अपीलकर्त्याची मागणी मान्य करता येणार नाही, असे जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, सांगली श्रीमती एम.डी.घोडे यांनी श्री.हळींगळे यांना कळविले असून आयोगाला सादर केलेल्या निवेदनातही नमूद केले आहे. ते रास्त आहे.

आपल्याला माहिती मिळाली. परंतु महत्वाच्या मुद्दयांची माहिती अद्याप आपल्याला मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री.हळींगळे यांनी केले. परंतु सर्व मुद्दयांची माहिती वारंवार देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी श्रीमती एम.डी.घोडे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सांगली श्री.राजेंद्र चव्हाण यांनी कागदपत्रांसह नमूद केले.

संबंधित कामांच्या बाबत योग्य त्या अटींचे पालन पूर्णपणे केले गेले, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, तर अटींचा भंग करुन काम झाले, असा श्री.हळींगळे यांचा दावा आहे. याबाबतची शहानिशा हा राज्य माहिती आयोगाच्या कक्षेतील विषय नाही.

श्री.हळींगळे यांना मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे, तीच तीच माहिती पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे मागून त्याबाबत अपिले करण्यात श्री.हळींगळे सर्व यंत्रणांचा वेळ अकारण घेत आहेत हे योग्य नाही, अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२६.६.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत सोनू जगताप
बी-२/४०२, अनुसूया इनक्लेव्ह (बी),
वानवडी, पुणे-४११०४० — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
श्री.सुभाष डुंबरे, प्रतिनिधी, अतिरिक्त आयुक्त, श्री.आर.पी.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ श्री.रामदास तांबे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.७.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | मौजे भोसरी स.नं.२१४ या मिळकतीच्या चोहोबाजूंनी बेकायदेशीर रस्त्यांची बांधकामे झालेली आहेत. या मिळकतीचे मालकांना दिलेल्या नोटीशीच्या सहीशिक्क्याच्या नकला. टेंडर्स मागविण्याकरीता काढलेल्या नोटीशीच्या नकला, टेंडर पास केल्याच्या प्रमाणित नकला, महानगरपालिकेचे बैठकीत ठराव पास केले असल्यास नकला, ठेकेदारांनी रस्ते पूर्ण केल्यावर तपासणी करुन अधिकाऱ्याने दिलेल्या अहवालाच्या प्रती, ठेकेदाराला दिलेल्या वर्क ऑर्डरची प्रमाणित प्रत, नगरसेवकांच्या दबावाखाली बेकायदेशीररित्या काम केले असल्यास तसा लेखी रिपोर्ट |

## विवेचन

मौजे भोसरी स.नं.२१४ या मिळकतीच्या चोहोबाजूंनी बेकायदेशीर रस्ते झाल्याच्या व अन्य सहा मुद्दयांच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.शशिकांत सोनू जगताप यानी जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री.जगताप यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांच्याकडे अपील केले. प्रत्यक्ष जागेवर स.नं.२१४ ची हद्द निश्चित नसल्यामुळे सदर ठिकाणी रस्त्याचे काम केलेबाबतचे अभिलेख उपलब्ध नाहीत, हा जन माहिती अधिकारी तथा उप शहर अभियंता, तसेच कार्यकारी अभियंता, स्थापत्य क मुख्यालय यांचा खुलासा मान्य करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.जगताप यांचे अपील नामंजूर केले. त्याविरुध्द श्री.जगताप यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सर्व्हे क्र.२१४ ची हद्द निश्चित आहे की नाही हा यातील मुद्दा आहे. आपली ३८ गुंठे जमीन रस्त्याच्या कामी घेतली गेली असल्याचे श्री.जगताप यांचे म्हणणे असून रस्त्याचे अतिक्रमण दूर करावे, अशी त्यांची मुख्य मागणी आहे. त्याबाबत विविध पातळ्यांवर ते सातत्याने अर्ज करीत आले आहेत. सर्व्हे क्र.२१४ ची हद्द निश्चित नाही हे म्हणणे खोटे आहे, असा त्यांचा दावा आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढे संबंधित नकाशांसह याबाबतची

वस्तुस्थिती स्पष्ट केली. श्री.जगताप यानाही ही सर्व माहिती व वस्तुस्थिती स्पष्ट करुन सांगण्यात आली असल्याचे कार्यकारी अभियंता, स्थापत्य क मुख्यालय यांनी सांगितले.

श्री.जगताप व इतरांनी सदरची मिळत श्री.अग्रवाल सुभाष व इतरांना दि.३.२.२००७ च्या करारनाम्याद्वारे विकसनासाठी दिलेली आहे. त्यानंतर दि.११.६.२००७ च्या करारनाम्याद्वारे श्री.अग्रवाल व इतरांनी मनपाच्या मंजूर विकास आराखड्यातील रस्ता क्षेत्रफळ ४१४.०० चौ.मी. मनपास हस्तांतरीत केले आहे व दि.१३.६.२००७ च्या पत्रान्वये सदर रस्त्याचे क्षेत्र मनापाच्या नावे करण्यात आलेले आहे. असे कार्यकारी अभियंता श्री.आर.पी.पाटील यांनी आयोगाला दि.२१.१.२००८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

सद्यस्थितीत श्री.जगताप यांनी सदर जागेचा मालकी हक्क हस्तांतरीत केलेला असलेने मालकी हक्कातील जागेतील रस्त्याबाबतचा प्रश्न मिटलेला आहे, तसेच श्री.जगताप यांनीही आपली कोणतीही तक्रार राहीली नसल्याचे नमूद करणारे पत्र दि.२१.१.२००८ रोजी आयोगाला सादर केले आहे.

## आदेश

अपीलकर्त्याची तक्रार राहिलेली नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि.२६.६.२००८

july-०८(june)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२७.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.अशोक नारायण कुलकर्णी<br>छत्रपती हाऊस, पौड रोड, पुणे ३८ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहसंचालक (प्रशासन), विकास साखर आयुक्त यांचे कार्यालय, साखर संकुल,शिवाजीनगर, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. अशोक नारायण कुलकर्णी यांनी साखर आयुक्तांकडून वेगवेगळ्या मुद्दयांची माहिती मागितली होती.

माहिती १५ दिवसांच्या आत अपीलकर्त्यास उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी मान्य केले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास दि. ६.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करून दिल्याचे आयोगास कळविले असून अपीलकर्त्याने त्यास दुजोरा दिला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.६.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. अरविंद दादा जाधव<br>शासकीय दुध योजना, सी-३,<br>एम.आय.डी.सी., जि.सातारा -४१५ ००४ |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कॉमन वेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे -३० |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कॉमन वेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे -३० |

वरील तीनही घटकात झालेल्या चर्चेनुसार कालबध्द पदोन्नतीच्या संदर्भात अपीलकर्त्यास माहिती मिळाली असल्याने आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ९.०६.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रघुनाथ शिवराम चौगुले
मु.पो.गोटखिंडी, ता.वाळवा, जि.सांगली अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक सांगली जिल्हा सहकारी कृषी
ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक, मर्यादित, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शाखा व्यवस्थापक सांगली जिल्हा सहकारी कृषी
ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक, मर्यादित, शाखा आष्टा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८० / सोलापूर/ २००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि.१४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रघुनाथ शिवराम चौगुले
मु.पो.गोटखिंडी, ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक सांगली जिल्हा सहकारी कृषी
ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित, सांगली प्रभारी श्री.व्ही.जी.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा शाखा व्यवस्थापक सांगली जिल्हा सहकारी कृषी
ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित, शाखा आष्टा
श्री.दिलीप अण्णासाहेब हिंगणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>वसंत पाणीपुरवठा, गोटखिंडी या संस्थेला सहीचा करार करुन घेतलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रत, कराराच्या वेळी घेतलेल्या मंजुरी व नावे पडलेले एकूण कर्ज, कर्ज दर्शविणारी कागदपत्रे, ऊस बिलातून आजअखेर हतात्मा साखर कारखान्याने पाठविलेली व आपणाकडे जमा असलेल्या सालाबादप्रमाणे रकमेची छायांकित प्रत. | |

## विवेचन

हुतात्मा साखर कारखाना पुरस्कृत वसंत पाणीपुरवठा सहकारी संस्था, गोटखिंडी या संस्थेच्या महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक मर्यादित, मुंबई, उपशाखा आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली यांच्याशी केलेल्या कराराबाबतची आपली सही असलेल्या व कर्जाचा तपशील दर्शविणाऱ्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता श्री.रघुनाथ शिवराम चौगुले (सावंत) यांनी मागितल्या होत्या. न्यायालयातील दाव्यात सदर कागदपत्रे दाखल केली असल्यामुळे देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक मर्यादित, मुंबई उपशाखा, सांगली यांनी श्री.चौगुले(सावंत) यांना कळविले. श्री.चौगुले(सावंत) यांनी अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक, सांगली जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित, सांगली यांच्याकडे केलेल्या अपिलानंतर त्यांच्या सूचनेनुसार शाखा व्यवस्थापकांनी श्री.चौगुले (सावंत) यांना कर्जाचे खातेउतारे पाठविले. परंतु आपण मागितलेली सर्व माहिती मिळाली नाही, ती मिळावी, संबंधितांवर शास्तीसह कारवाई व्हावी, या मागणीसाठी श्री.चौगुले(सावंत) यांनी आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.चौगुले (सावंत)यांच्या नांवावर रु.५९०००/- इतके कर्ज सहभागीदार सभासद म्हणून आले आहे. परंतु आपल्याला कर्ज मान्य नसून वसूल केलेली रक्कम परत मिळावी यासाठी त्यांनी

बँकेविरुध्द व पाणी पुरवठा योजनेविरुध्द सांगलीच्या सहकार न्यायालयात दावा दाखल केला होता. त्याचा निकाल श्री.चौगुले (सावंत) यांच्या बाजूने झाल्यामुळे बँकेने वरिष्ठ न्यायालयात अपील केले. त्या न्यायालयाने मूळ दावा पुन्हा फेरचौकशीसाठी सहकार न्यायालयाकडे परत पाठविला. त्याचा निकाल अद्याप लागलेला नाही, त्यामुळे न्यायालयात दाखल असलेल्या कागदपत्रांच्या प्रती श्री.चौगुले (सावंत) यांना देता आल्या नाहीत, असे बँकेचे प्रभारी व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक, सांगली श्री.व्ही.जी.शिंदे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. मूळ ताबेगहाण दस्त व भाडेपट्टा न्यायालयात दाखल केला असल्याने त्याची प्रमाणित प्रत देता आली नाही मात्र त्याच्या छायांकित प्रतीवरुन घेतलेली प्रत श्री.चौगुले (सावंत)यांना दि.१८.१०.२००७ रोजी पाठविली आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे. मात्र ताबेगहाणखत व भाडेपट्टा याच्या प्रतीवर श्री.रघुनाथ शिवराम कुलकर्णी असे नाव असून 'कुलकर्णी' हे आडनाव खोडून त्या जागी चौगुले हे आडनाव लिहिले आहे व वय-४७ वर्षे नमूद केले आहे. आपले नांव श्री.रघुनाथ शिवराम चौगुले (सावंत)असे असून वय ८० वर्षे आहे. आपली शेती बँकेच्या कब्जात नाही हे दर्शविण्यासाठी दि.१.३.२००२ व दि.६.३.२००८ चा ७/१२ उतारा जोडला आहे. व आपल्या जमिनीला शासनाचा पाणीपुरवठा असल्याचे दर्शविणारे शाखा अधिकारी पाटबंधारे शाखा, वाळवा यांच्या कार्यालयाचे ४.८.१९९८ चे पत्र सोबत जोडले आहे. यावरुन आडनावातील व वयातील फरकाबरोबरच ताबेगहाण व भाडेपट्टा याबाबतची माहिती खोटी आहे, असे प्रतिपादन श्री.चौगुले (सावंत) यांनी लेखी व तोंडी निवेदनात केले.

संबंधित विषयाबाबत श्री.चौगुले (सावंत) यांनी विविध पातळ्यांवर अर्ज केले असून न्यायालयात दावा प्रलंबित आहे. नाव व वयातील बदल हा लिपिकाच्या चुकीने झाला असल्याचे जन माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक, सांगली जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित, शाखा आष्टा श्री.दिलीप आण्णासाहेब हिंगणे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी व्यवस्थापक, सांगली जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित, सांगली श्री.व्हि.जी.शिंदे यांनी सांगितले. परंतु ताबेगहाणखत व भाडेपट्टा यासारख्या महत्त्वाच्या कागदपत्रामध्ये अशी चूक कशी होऊ शकते, याचे समाधानकारक स्पष्टीकरण ते देऊ शकले

नाहीत. श्री.चौगुले (सावंत) यांच्या कर्जप्रकरणाबाबतची वस्तुस्थिती न्यायालयातच स्पष्ट होईल, असे प्रतिपादन त्यांनी केले. संबंधित कागदपत्रांची शहानिशा न्यायालयात झाल्यानंतर दिलेल्या माहितीच्या खरे खोटेपणाबाबत वस्तुस्थिती स्पष्ट होईल. तोपर्यंत त्याबाबत कोणताही निष्कर्ष काढता येणार नाही.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.६.२००८

जूलै-०८-जून-सोलापूर